# भूमिका

**राजकीय घडामोडींचे सखोल विवेचन करणाऱ्या**
**वृत्तपत्रीय लेखांचा संग्रह!**

**हेमंत देसाई**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**भूमिका**
हेमंत देसाई

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
हेमंत देसाई
सी-३, गुलमोहर, महानगरपालिका वसाहत,
दा.ग. महाजनी पथ, फातिमा चर्चजवळ,
शिवडी पश्चिम, मुंबई- १५
मो. नं. ९८२०४७९६८८

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २३०/-

# भूमिका

# प्रस्तावना

वाचकहो,

राजकारणापासून कोणी दूर पळू शकत नाही. साक्षरता वाढली आहे आणि शहरीकरणदेखील. टी.व्ही., इंटरनेट, मोबाईलमुळे सामाजिक-राजकीय जागरूकता वाढत आहे. जगण्याचे सर्व प्रश्न भिडतात ते शेवटी राजकारणाच्याच उंबरठ्यापाशी. तरीदेखील मतदानाची टक्केवारी कमी आहे. राजकीय पक्षांमधील जनतेचा सक्रिय सहभाग कमी आहे. लोक बोलतात खूप, पण सामाजिक-राजकीय कार्यात प्रत्यक्ष भाग मात्र ते कमीच घेतात. याला अपवाद जन आंदोलनांचा! रोहित, वेमुला व कन्हैयाच्या निमित्ताने तरुण पुन्हा एकदा जागा झाला, हे खूपच आशादायक आहे.

काही वर्षांपूर्वी 'महानगर'मधून मी 'भूमिका' हे सदर लिहीत असे. ते खूप गाजले. प्रचलित राजकारणावर नेम धरतानाच, मूळ विषयाची सांगोपांग माहिती व चिकित्सा असे त्याचे स्वरूप होते. त्यामुळे संदर्भ बदलणे, काही विषय-व्यक्तींचा मृत्यू झाला, कुणी पद वा मते बदलली, तरी प्रश्न कायम होते.

त्यामुळेच ते पुस्तकाच्या स्वरूपात यावे, असे वाटले. 'रिया पब्लिकेशन्स्'चे उत्साही मालक-प्रकाशक श्री. शीतल मेहता, संपादिका मनीषा सोमण यांच्यामुळेच ते साकार होऊ शकले. त्यांचे व इतर सर्व संबंधितांचे आभार. वाचक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

✦✦✦

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे...! | ............ | ९ |
| २. सह्याद्रीचे वारे | ............ | १५ |
| ३. आदिकांचा 'गोविंदा'! | ............ | २१ |
| ४. पोलीस : राज्यकर्त्यांना ओलीस | ............ | २७ |
| ५. आघाडीची झाडाझडती | ............ | ३३ |
| ६. कामगार-पुढाऱ्यांनो, नेक व्हा! | ............ | ३९ |
| ७. किशोर कांबळेचं काय झालं? | ............ | ४४ |
| ८. यारों मुझको, हेटेरिया हुआ... | ............ | ५० |
| ९. बारामतीची भानामती! | ............ | ५५ |
| १०. बामणी कावा? नव्हे, बामणी हवा | ............ | ६२ |
| ११. पोलिटिकल ते काय टिकंल... | ............ | ६८ |
| १२. राष्ट्रवादीचा फॉर्म्युला जिंकला! | ............ | ७४ |
| १३. बुलेटप्रुफ नसलेली व्यवस्था | ............ | ८० |
| १४. काँग्रेसमधील कुरुक्षेत्र | ............ | ८६ |
| १५. पवारांची जादू की झप्पी! | ............ | ९२ |
| १६. नेहरूवादाचा नवा आशय | ............ | ९८ |
| १७. गुजरातमध्ये दांडी, मुंबईत लाठी! | ............ | १०३ |
| १८. पिक्चर अभी बाकी नहीं है दोस्त | ............ | १०८ |
| १९. तेरा पोलिटिकल अत्याचार...! | ............ | ११४ |
| २०. समाजवादी 'गंगाजल' | ............ | १२० |

२१. पांढऱ्या हत्तीचं नियोजन! ............ १२७
२२. मर मर मरा आणि शीज शीज शीजा ............ १३३
२३. रसगोत्रांचे गोत्र ............ १३८
२४. विरोधी पक्षांतील टशन! ............ १४४
२५. गर्जनाकारी राजकारण ............ १४९
२६. पी. एम. इन वेटिंग ............ १५७
२७. लोकमान्य आणि आपण सामान्य... ............ १६३
२८. अ वेनस्‌डे... ............ १६९
२९. वाकेन, पण मोडणार नाही! ............ १७४
३०. 'ज्योती' कलश छलके... ............ १८०
३१. छद्म पुरस्कार! ............ १८७

✦✦✦

## कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे...!

'मशाल' चित्रपटात दिलीप कुमार पत्रकार असतो. स्मगलर्सविरुद्ध तो आवाज उठवतो, तेव्हा त्याचा प्रेस जाळला जातो, त्याच्या घरावर हल्ला होतो, त्याची बायको सुधा मरत असताना, हाका मारूनही कोणी मदतीला येत नाही... या पत्रकाराला मग प्रत्यक्ष शस्त्र हाती घ्यावं लागतं...

'फुटपाथ'मध्ये (दिग्दर्शक झिया सरहदी) नोशू (दिलीप कुमार) हा प्रामाणिक, पण गरीब लेखक आहे. दुष्काळी परिस्थितीत, गांजलेल्या अवस्थेत औषधांचा काळा बाजार करणाऱ्यांच्या तावडीत तो सापडतो. त्याच्या खिशात पैसा खुळखुळू लागतो. नोशू आपल्या तत्त्वांना तिलांजली देतो, प्रेयसीला सोडतो आणि भावालाही धुत्कारतो. मात्र आपली चूक उमगून, शेवटी तो लक्षाधीश होण्याचं स्वप्न सोडून देतो. तो नीतीला धरून वागू लागतो...

देवकी बोस दिग्दर्शित 'पथिक'मध्ये (शंभू मित्र, तृप्ती मित्र, मोनिका गांगुली) असीम रॉय हा अयशस्वी लेखक आहे. जखमी खाण कर्मचाऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, यासाठी तो लढता लढता मरतो...

दिग्दर्शक पी. रामदास यांनी १९५५ मध्ये 'न्यूजपेपर बॉय' हा चित्रपट बनवला होता. त्यामध्ये एका कामगार आणि मोलकरणीचा मुलगा अप्पू आहे. वडिलांचा कारखान्यात अपघात होतो. मग त्यांना काढून टाकलं जातं आणि त्यांचा मृत्यू होतो. अप्पूला शाळा अर्धवट सोडावी लागते. त्याची आईही मरते, तेव्हा भावंडांचा सांभाळ करण्यासाठी तो घरोघरी वृत्तपत्रं टाकण्याचं काम करतो. अपार कष्ट करून तो परिस्थितीवर मात करतो...

'श्री ४२०'मध्ये नायक राजू धर्मानंद या भांडवलदाराच्या निकट जातो. धर्मानंद त्याचा उपयोग करून बेघरांना फसवतो, तेव्हा राजू पेटून उठतो...

'नया जमाना' मध्ये (नायक धर्मेंद्र) एक बडा भांडवलदार-प्रशासक, नायकाचं बाड स्वत:च्या नावावर प्रसिद्ध करतो. नायक त्याचे खोटे धंदे आणि ढोंगबाजीवर हल्ला चढवतो. शेवटी सत्याचाच विजय होतो.

पण हे सर्व सिनेमात. वास्तवात सत्याचा विजय होताना दिसत नाही. त्यामुळेच तळेगाव दाभाडे इथले सामाजिक कार्यकर्ते सतीश शेट्टी यांची ऐन सकाळी सात वाजता रस्त्यावर, चाकू-तलवारींनी हत्या केली जाते. त्यांच्या हत्येमुळे कडकडीत बंद पाळला जातो. पाच हजारांचा समुदाय त्यांच्या अंत्यविधीस येतो. पण समाज हलत नाही.

जागतिकीकरणापासून ग्लोबल वॉर्मिंगपर्यंत प्रत्येक विषयावर प्रबोधन करणारे मराठा स्ट्राँगमन शरद पवार, साधा सांत्वनपर संदेश पाठवत नाहीत. वर्षावर सत्यसाईबाबांची शोडषपचारे पूजा बांधणारे मुख्यमंत्री अशोक चव्हाण 'या प्रकरणाचा कसून तपास केला जाईल' एवढं सांगून पुढल्या उद्घाटनपर कार्यक्रमास निघून जातात. मावळचे सुभेदार, जलसंपदामंत्री अजितदादा पवार यांना तळेगावला ताबडतोब भेट द्यावी, असं वाटत नाही. अर्थमंत्री दिलीप वळसे पाटील यांना मतदारसंघात जाता-येताना तळेगावला वळसा घालावा, असं नाही वाटत. म्हणजे पडद्यावर काहीही घडो; वास्तवात नायक जवळपास एकाकीच लढत असतो. तो लढता लढता मेला, तरी समाजातील सत्ताधाऱ्यांना, धनिकपणिकांना त्याची पर्वा नसते. ते आपापल्या पैसे कमावण्याच्या कामात गर्क असतात. त्यांच्या कपड्यांची इस्त्री बिघडत नाही.

सतीश शेट्टींनी आयडियल रोड बिल्डर्स या कंपनीच्या १८४० एकर जमीन घोटाळ्याचं प्रकरण लावून धरलं होतं. राज्यात टोलवसुलीची घाऊक कंत्राटं याच कंपनीस देण्यात आली आहेत. पुणे-मुंबई द्रुतगती मार्गामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, भाजप अध्यक्ष नितीन गडकरी यांच्याशी या कंपनीचे घट्ट संबंध आहेत. पण युतीच काय, लोकशाही आघाडी सरकारही या मंडळींनी खिशात घातलंय. पण मंडळाचे निवृत्त संचालक राम खर्चे यांनी आपल्या जन्माचे दोन दाखले सादर केले. त्यावर सतीशने प्रकाश टाकला. लोणावळा आणि वडगाव उपनिबंधक कार्यालयातील बनावट दस्तांचे लफडे बाहेर काढल्यावर दुय्यम उपनिबंधक अश्विनी क्षीरसागर यांना निलंबित केलं गेलं. रॉकेलचा काळा बाजार नि अनधिकृत बांधकामांचे गैरव्यवहार त्यांनी उजेडात आणले. हजारो एकर सरकारी जमिनींच्या परस्पर खरेदी-विक्रीचा घोटाळा सतीशने बाहेर काढला. या सगळ्याचं 'प्रायश्चित्त' अखेर त्यांना मिळालं...